**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ ची जबानी**

**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- बाळासाहेब विष्णू डोंगरे,

वय- ४० वर्षे,

व्यवसाय- सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन लातूर ग्रामीण,

राहणार- लातूर

**<u>अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सरकारी वकिल श्रीमती एम.आर.कुलकर्णी यांच्या वतीने</u>**

१. सन-२०२१ मध्ये मी औसा पोलीस स्टेशन येथे एपीआय म्हणून कार्यरत होतो. दि.०९/०३/२०२१ संध्याकाळी आदेश मिळाला होता की १० तारखेला मौजे गोंद्री येथे बंदोबस्त आहे. तो बंदोबस्त सतिष भानुदास मंदाडे यांच्या गोंद्री शिवारातील गट क्र.३८ येथे होता. दुस-या दिवशी मी, हे.कॉ. लामतूरे, हावलदार बोळंगे, तुरे, बेरळीकर, महिला पोलीस अंमलदार सुर्यवंशी, अष्टांगे व पकाले असे सकाळी १०.०० च्या सुमारास त्या ठिकाणी पोहोचलो. त्या ठिकाणी सतिष मंदाडे यांनी त्यांच्या शेतात तार कुंपनाचे काम सुरू केले होते. त्यासाठी त्यांनी जेसीबी बोलाविलेला होता. त्यांनी काम सुरू केल्यावर व्यकंट शिंदे, निळंकठ शिंदे, दयानंद शिंदे, सदानंद शिंदे, पांडूरंग शिंदे, नवनाथ शिंदे व त्यांच्या घरातील महिला त्या ठिकाणी आल्या व त्यांनी जेसीबी आडविला. आम्ही त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला त्यांच्याकडे काही जमीनीचे मालकीचे कागदपत्र असतील तर सादर करा. परंतू त्यांनी कोणतेही कागदपत्र दाखविले नाही. त्यावेळी त्या ठिकाणी आलेले तलाठी चव्हाण यांनी तहसिलदार औसा यांना फोन केला व शिंदे कुटूंब अडवणूक करीत असल्याची माहिती दिली. त्यांनी तार कुंपनाला अडथळा करून अडवणूक केली. जेसीबीच्या आडवे बसलेले होते. तेव्हा तहसिलदार यांनी सांगितले की, त्यांच्याकडे जमीनीच्या मालकीचे काही कागदपत्रे असतील तर ते घेवून तहसिल कार्यालयात पाठवा. आम्ही तहसिलदार यांचा निरोप व्यकंट शिंदे व त्यांच्या कुटूंबियांना दिला मात्र त्यांनी आम्ही येथून हालणार नाही व कोणतेही कागदपत्र दाखविणार नाही असे म्हणून

आरडोओरड केली. त्यांनी सांगितले की, त्यांच्या वकिलांनी सांगितले आहे की, जोपर्यंत न्यायालयाचा आदेश येत नाही तोपर्यंत तेथून कोठेही जायचे नाही. तेथून म्हणजे गट क्र.३८ शेतातून जायचे नाही असे सांगितले. त्यांच्या घरातील वयस्कर महिला कस्तूरबाई शिंदे यांना जेसीबीच्या आडवे आणून बसविले. ते सर्व लोक सतिष मंदाडे यांच्या अंगावर धावून गेले. आम्ही त्यावेळी मध्यस्थी करून सोडवा सोडव केली. त्या ठिकाणी बळाचा वापर केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो म्हणून आम्ही तेथून पोलीस ठाण्यात गेलो. घटनेबाबत वरिष्ठांना व तहसिलदार यांना फोनवरून माहिती दिली. या लोकांनी गैरकायदयाची मंडळी जमवून शासकीय कामात अडथळा निर्माण केला व मा. जिल्हाधिकारी यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लघंन केले. त्यानंतर पोलीस अंमलदार बेरळीकर यांनी सरकारतर्फे फिर्याद देवून गुन्हा नोंदविला. गुन्हयाचे तपासी अधिकारी श्री.गायकवाड यांनी माझा जबाब नोंदविला होता. व्यकंट, विजयमाला, अश्वीनी, निळकंठ व गीता हे आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. कस्तूरबाई व पांडूरंग हे न्यायालयात हजर नाहीत. त्यांना दाखविल्यास ओळखू शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलट तपास आरोपींकरिता विधीज्ञ श्री.बी.एल.शिंदे यांच्या वतीने</u>**

२. त्यावेळी नरसिंग ठाकूर हे पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक होते. या गावचे बिट अंमलदार लामतूरे हे होते. मी ९ तारखेला कोणते कर्तव्य करू आलो होतो ते मला आठवत नाही. त्या दिवशी हजेरी मेजर कोण होते ते मला आठवत नाही. हजेरीच्या वेळेस किती पोलीस कर्मचारी होते ते मला आठवत नाही. त्या दिवशी एकूण आठ पोलीसांची डयुटी लावलेली होती. हे मला सांगता येणार नाहीा की, मार्च-२०२१ या कालावधीत कोव्हीडसाठी ब-याचवेळा बंदोबस्त लावला जात होता. हे मला आठवत नाही की, मार्च-२०२१ ला कडक लॉकडाऊन होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अवास्तव प्रवासांना बाहेर जिल्हयातील लोकांना येण्या जाण्यास बंदी होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मास्क घालणे बंधनकारक होते. मी पूर्वी सतिष मंदाडे यांच्या शेतात गेलो होतो का हे मला आठवत नाही. मी स्वतः मला बंदोबस्तासाठी

जाण्याचा लिखीत आदेश पाहिलेला होता. मला बंदोबस्ताला जाण्याचा लिखीत आदेश प्रभारी अधिकारी यांचा होता. मला परतीची वेळ सांगितलेली नव्हती. मी शासकीय वाहन सुमो गाडीने त्या ठिकाणी गेलो होतो. त्या दिवशीच्या वाहन चालकाचे नाव आठवत नाही. त्या गाडीचा क्रमांक आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, शासकीय वाहन कर्तव्यावर घेवून जाताना त्याची नोंद लॉगबुकला करणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे आहे की, कामाचा उद्देश लॉगबुकला करणे बंधनकारक आहे. पोलीस स्टेशनपासून ते गाव किती अंतरावर होते ते मला सांगता येत नाही. मला गट क्र.३८ चे एकूण क्षेत्र सांगता येत नाही. त्या गटाच्या चतुःसिमेत कोणाचे क्षेत्र होते ते मला आठवत नाही. सर्व कर्मचा-यांमध्ये वरिष्ठ अधिकारी मी होतो. मी वरिष्ठ अधिकारी म्हणून त्या गटाच्या शेत शेजा-याला आगाऊ नोटिस देवून कळविलेले नव्हते. माझ्या माहितीनुसार आमच्या सोबत असणा-या महसुल अधिकारी तलाठी यांनी आगाऊ नोटिस देवून कळविले होते. ती नोटीस मी स्वतः पाहिली आहे. ती नोटिस संचिकेमध्ये दाखल नाही. ते तलाठी कोणत्या सज्ञाचे होते ते मला आठवत नाही. त्यावेळी शोभा पुजारी या तहसिलदार होत्या. मी त्या ठिकाणी गेलो त्यावेळी तलाठी व मी सोबतच पोहोचलो. तलाठी कोणत्या वाहनाने आले होते ते मला आठवत नाही. मला जेसीबीचा क्रमांक व त्याच्या चालकाचे नाव आठवत नाही. ती जेसीबी कोणाच्या मालकीची होती ते मला माहित नाही. मला मिळालेल्या आदेशामध्ये जेसीबी किंवा जेसीबी चालकाचा उल्लेख नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, जेसीबीच्या सहायाने वायर फिनीशींग करता येत नाही. खड्डे खोदण्याव्यतिरिक्त तारेला ताण देणे हे जेसीबीचे वायर फिनीशींगमध्ये काम असते. खड्डे खोदणे व ताण देणे या व्यतिरिक्त ईतर काम करण्यासाठी त्या ठिकाणी आणखी कोणी मजूर आले होते का ते मला आठवत नाही. त्या ठिकाणी सिमेंट, पोल, वाळू, खडी अशाप्रकारचे साहित्य पडले होते का ते मला आठवत नाही. ते काम सकाळी १०.३० वाजणेच्या सुमारास चालू झाले होते. ते काम शेताच्या कोणत्या दिशेला चालू होते ते मला सांगता येत नाही. साक्षीदार पुढे सांगतात की, ते काम डांबरी रस्त्याच्या बाजूला ते काम चालू होते. तो डांबरी रस्ता शेताच्या कोणत्या बाजूला होता ते मला आठवत नाही. मी एपीआय होवून त्यावेळी दोन वर्षे झालेली

होती. अर्धा तासामध्ये खड्डे खोदण्याचे काम सुरू होते. नेमके किती खड्डे खोदले होते ते मला आठवत नाही. घटनेच्या वेळी जेसीबी शेतामध्ये होती. ती जेसीबी कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे काम करीत चालली होती ते मला आठवत नाही. तार कुंपनाचे काम शेताच्या एका बाजूने चालू होते. ज्या बाजूने काम चालू होते त्याच्या बाजूला मंदाडेचे शेत होते का ते सांगता येत नाही. त्यावेळी मोजणीदार तेथे नव्हता. मी तेथे जाण्यापूर्वी शेतीचा नकाशा पाहिला नव्हता. मोजणी कार्यालयाचा एखादा कर्मचारी त्या ठिकाणी येवून हद्दी सांगत होता का ते मला आठवत नाही. माझ्या समक्ष मंदाडे यांचे शेत तलाठी यांनी मोजले होते. त्या मोजमापाचा लेख माझ्या समक्ष तयार केला नव्हता. हे मला सांगता येणार नाही की, मोजणी  कार्यालयाच्या सक्षम अधिका-यांनी त्या गटाच्या हद्दी माझ्या समक्ष कायम केल्या नव्हत्या. मी त्या दिवशी मास्क घातलेला होता का हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मंदाडे हा शासकीय कर्मचारी नव्हता. तसेच जेसीबी शासकीय नव्हता किंवा मंदाडेचे शासकीय काम चालू नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्या ठिकाणी खड्डे करणे हे माझ्या कर्तव्याचा भाग नव्हता. जे लोक आले ते कोणत्या दिशेकडून आले ते मला आठवत नाही. माझे काम तालूका दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार चालले होते. त्या आदेशामध्ये शेताला कमाउंड करायचे आहे असे लिहीले होते का ते मला आठवत नाही. ज्या महिलेला जेसीबीच्या समोर बसविले त्यावेळी त्या जेसीबीची दिशा काय होती हे मला आठवत नाही. यापूर्वी मी कस्तूरबाई यांना पाहिलेले नाही. यापूर्वी मी बाकीच्या लोकांना पाहिले होते का ते आठवत नाही. मी घटनेपूर्वी त्या व्यक्तीना नावानिशी व चेह-यानिशी ओळखत होतो का ते मला आठवत नाही. त्या दिवशी माझ्यासोबत तीन महिला कर्मचारी होत्या. त्या दिवशी त्या व्यक्तीना ताब्यात घेणे किंवा प्रतिबंधात्मक कार्यवाही करणे असे काम झाले होते का ते मला आठवत नाही. त्या व्यक्तीना बळाचा वापर करून जमीनीच्या बाहेर काढले असे घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या दिवशी त्या व्यक्तीना ताब्यात घेवून पोलीस ठाण्यात आणले नव्हते. त्यावेळी त्या व्यक्तींचा किंवा आमचा शारिरिक स्पर्श झाला होता का हे मला आठवत नाही. घटनेनंतर तहसिलदार त्या ठिकाणी आले होते का ते मला सांगता येणार नाही. ज्या ठिकाणी जेसीबी थांबली त्या ठिकाणाचे

रस्त्यापासूनचे निश्चीत अंतर मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठिकाणच्या मी सांगितलेल्या वयस्कर महिलेवर गुन्हा दाखल करण्यासाठी दबाव टाकण्यात आलेला होता. त्या दिवशी जे वकिल साहेब होते ते माझ्याशी बाललेले होते परंतू त्यांचे नाव मला सांगितले नव्हते. मी त्या दिवशी त्या लोकांना जमीनीतून बाहेर काढण्याचा न्यायालयाचा आदेश पाहिला नाही. घटनेदरम्यान ईतर शेत शेजारी जमा झाले होते काय ते मला आठवत नाही. गावचे सरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष त्या ठिकाणी आले होते का ते मला आठवत नाही. मी वरिष्ठ अधिका-यांना अशा स्वरूपाची लेखी माहिती दिली नाही. त्या गटामध्ये ईतर कोणत्या लोकांचे शेत आहे का ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, तारेचे कुंपनाचे काम हे अंतर्गत काम नसून ते हद्दीचे काम आहे.

३. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी कस्तूरबाई हिचे म्हणणे होते की, कंपाऊंड करण्यामुळे त्यांच्या शेतात १५ फुट अतिक्रमण होत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कस्तूरबाई हिचे मंदाडे यांना तुमचे क्षेत्र मोजून घ्या असे म्हणणे होते. हे म्हणणे खरे नाही की, सतिष मंदाडे हा खुप मोठा पैसे वाला जमीनदार आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझा जाण्याचा एवढाच उद्देश होता की त्या लोकांविरूध्द कलम ३५३ चा गुन्हा दाखल करायचा, त्यांना ताब्यात घ्यायचे व सतिष मंदाडे यांना जमीनीचा ताबा दयायचा. हे म्हणणे खरे नाही की, त्या महिलेने मला जमीनीची मोजणी करून हद्दी खुणा कायम करा व नंतर कंपाऊंड करा अशी विनंती केली असता आम्ही त्या ठिकाणाहून निघून गेलो. मी ज्या स्टेशन डायरीला नोंद घेतली त्याची प्रत तपासादरम्यान तपासी अधिका-याकडे दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी त्या ठिकाणी कस्तूरबाई व्यतिरिक्त ईतर कोणतेही आरोपी तेथे हजर नव्हते. मी आजअखेरपर्यंत त्या गटाचा सातबारा पाहिलेला नाही. हे मला सांगता येत नाही की, त्या गटामध्ये धोंडीराम शिंदे, निळकंठ शिंदे, पांडूरंग शिंदे व व्यकंट शिंदे यांच्या जमीनी आहेत.

४. हे म्हणणे खरे नाही की, आजही मी कोणत्या नावाची कोण व्यक्ती आहे हे सांगू शकत नाही. हे मला आठवत नाही की, मी कर्तव्यावर जात असताना मोजणी

कामाचा बंदोबस्त अशी नोंद करून गेलेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दोन दिवसानंतर आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करून त्या जमीनीचा ताबा मंदाडे यांना मिळवून दिला. 'कोणतेही कागदपत्र दाखविणार नाही असे म्हणून आरडोओरड केली' हा मजकूर माझ्या जबाबात सांगितलेला होता. तो मजकूर माझ्या जबाबात का नाही त्याचे कारण मला सांगता येत नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, मी १० तारखेला त्या ठिकाणी गेलो, आरोपींनी तेथे जेसीबी आडविली व मी त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला परंतू त्यांनी ऐकले नाही व आरडाओरड केला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, चव्हाण यांनी तहसिलदार यांना फोन केला व काम अडविल्याचे सांगितले, तसेच त्यांनी त्या ठिकाणाहून हालणार नाही व कागदपत्रेही दाखविणार नाही असे म्हणून आरडोओरड केला, वकिलांनी न्यायालयाचे आदेश येईपर्यंत तेथून जायचे नाही, गट क्र.३८ मधून जायचे नाही असे सांगितले, कस्तूरबाई हिला तेथे आणून बसविले, मंदाडेच्या अंगावर धावून गेले, मी सोडवा सोडव केली, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल म्हणून आम्ही तेथून निघून गेलो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गैरकायदयाची मंडळी जमवून शासकीय कामात अडथळा केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी मला आदेश वेगळा होता, मी आदेशाची वेगळी नोंद केली व वेगळे कर्तव्य करून अधिकाराचा गैरवापर केला. हे म्हणणे खरे नाही की, केवळ मंदाडे यांना जमीनीचा ताबा मिळवून दयावा म्हणून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही.

**उलट तपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

Digitally signed by PADMAKAR PRABHAKAR KESTIKAR
Date: 2026.02.05 17:55:17 +0530

(पी.पी.केस्तीकर)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
लातूर..

दि.०५/०२/२०२६